# मेट्रो स्थानकांतील स्लॅब पूर्ण

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**



करोनाकाळातील निर्बंधांमुळे मेट्रो ३ अर्थात, कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रोचे काम अतिशय वेगाने पूर्ण होत आहे. या मेट्रोच्या सहा स्थानकांवरील छताचे काम पूर्ण झाले आहे. मात्र कारशेड जागेच्या अनिश्चिततेमुळे सर्व कामे पूर्ण झाल्यानंतरही भुयारी मेट्रो प्रवासासाठी मुंबईकरांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागणार आहे.

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनद्वारे मेट्रो ३ मार्गाचे काम सध्या सुरू आहे. या पूर्ण मार्गात एकूण २६ भुयारी स्थानके आहेत. यापैकी मुंबई सेंट्रल, हुतात्मा चौक, विधान भवन, मरोळ, एमआयडीसी आणि सीप्झ या स्थानकांतील छतांचे (स्लॅब) काम १०० टक्के पूर्ण झाले आहे, असे मेट्रोच्या प्रवक्त्याने सांगितले.

तत्कालीन फडणवीस सरकारने मेट्रो ३ची कारशेड आरेमध्ये करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र राज्यात सत्तांतर झाल्यानंतर शिवसेना-काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या महाविकास आघाडी सरकारने आरेबाबतचा निर्णय रद्द करत कांजुरमार्ग येथे कारशेड उभारण्याची घोषणा केली. दरम्यान, कांजुरमार्गच्या जागेवर केंद्र सरकारने दावा केला. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. कारशेडचा निकाल लागल्यानंतर मोजणी, आराखडा या सर्व गोष्टी सुरुवातीपासून कराव्या लागणार आहे. यामुळे मेट्रो प्रशासन आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातील अधिकाऱ्यांचेही कारशेडच्या निर्णयाकडे लक्ष आहे.

पॅकेज १ ते ७पैकी पॅकेज ३ वगळता उन्य सर्व पॅकेजचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. मुंबई सेंट्रल, महालक्ष्मी, सायन्स म्युझियम आणि आचार्य अत्रे चौक या पॅकेज ३चे ७७ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून येत्या काही दिवसांत उर्वरित कामही वेगाने पूर्ण करण्यात येणार असल्याचे मेट्रो प्रशासनाकडून सांगण्यात आले.